**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.45269, JULY-AUG 2017, VOL- 4/35*

# सातारच्या प्रतिसरकारच्या कार्यात स्त्री तुफान सेनेचे कार्ये : एक विश्लेषणात्मक अभ्यास

**सर्जेराव भामरे[१], Ph. D. & मंदा तापीराम मोरे[२], Ph. D.**

[१]*प्राचार्य दुरबार*

[२]*प्रा. श्री.सु.हि.नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वापूर, ता. नवापूर जि. नंदुरबार*

***Abstract***

*९ ऑगस्ट १९४२ चळवळीची लाट देशभर पसरली तितक्याच वेगाने ती शांत झाली. परंतु सातारमध्ये भूमिगत क्रांतीकारकांनी आता ठरवुन घेतले होते की, जेल भरण्यापेक्षा भूमिगत राहून इंग्रज सरकारला ‘सळो की पळो’ करुन सोडले पाहिजे. त्यानुसार त्यांनी सातारमध्ये प्रतिसरकार स्थापन करुन आपला स्वतंत्र्यपणे राज्यकारभार सुरु केला. प्रतिसरकारात लीलाताई पाटील, राजमती पाटील, लक्ष्मीबाई नायकवडी, विजया लाड या सारख्या स्त्रियांनी तूफानी सेनादलात महिला कॅप्टनपदी यशस्वीपणे कार्य पार पाडून प्रतिसरकाची चळवळ यशस्वी केली.*

***Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com***

**प्रास्ताविक :-**

भारत एक स्वतंत्र सर्वभौम राष्ट्र म्हणून १५ ऑगस्ट १९४७ पासून जगाच्या नकाशात दाखविले जाऊ लागले. डिसेंबर १८८५ ला भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली असली तरीही १८५७ च्या उठावापासून वेगवेगळया मार्गांनी ब्रिटीश सत्तेला शह देण्याचा भारतीयांनी प्रयत्न केला. राष्ट्रीय सभेच्या नेतृत्वाखाली मवाळ, जहाल व क्रांतीकारी, असहकार, सत्याग्रह आणि सविनय कायदेभंग या मार्गाने दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक यांनी हा स्वातंत्र्यसंग्राम चालू ठेवला या स्वातंत्र्यसंग्रामात पुरुषांप्रमाणेच अनेक जाती, धर्म व पंथाच्या स्त्रियांचा सहभाग वैशिष्टयेपूर्ण होता. डॉ. ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, पंडीता रमाबाई, भिकाजी कामा, अरुणा असफअली, सरस्वतीबाई जोशी इत्यादी प्रसिध्द स्त्रियांच्या कार्याची माहिती अनेक प्रकारच्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय लिखाणातून सहज उपलब्ध होते. परंतु देशाच्या वेगवेगळया प्रांतातून ग्रामीण स्त्रियांनी केलेल्या राजकीय चळवळींचा इतिहास आजही अज्ञातच राहिला आहे. याला सातारचे प्रतिसरकार अपवाद नाही. सातारच्या प्रतिसरकारात प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या अनेक महिलांनी आपला सहभाग नोंदविला आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

**संशोधन विषयाची गरज :-**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील शेवटचे पर्व म्हणजे १९४२ चे ‘भारत छोडो’ आंदोलन. या आंदोलनाने भारताच्या राजकीय इतिहासात स्वतःचा एक वेगळाच ठसा उमटवला आहे. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली सर्व

भारतातील जनतेने आपापल्या परीने झेपेल असे आंदोलन करुन महात्माजीच्या 'ज रा जिं वा मरा' या घोषणेला प्रतिसाद दिला. अनेक पुरुष घर-संसार सोडून स्वातंत्र्यलढयात सहभाजी झाले. या लढयात पुरुषांच्या बरोबरीने अनेक स्त्रियांनींही सहभाग घेतला.

लीलाताई पाटील, राजमती पाटील, लक्ष्मीबाई नायकवडी, विजया लाड यांच्या बरोबर साताऱ्यातील अनेक स्त्रियांनी सातारच्या प्रतिसरकारच्या लढयात प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सहभाग घेतला होता. परंतु दुर्दैवाने आजही यातील काही महिलांची नावे इतिहासाला माहित नाही त्यामुळे इतिहासाच्या पानावर ती नावे येण्याचा आणि जगाला यांची माहिती होण्याचा प्रश्नच येत नाही. अशा काळाच्या पडदयाआड लपलेल्या शूर स्त्रियांची नावे आणि कर्तृव इतिहासाला माहिती व्हावे यादृष्टीने प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

**संशोधन विषयाचे महत्व :-**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास केल्यास भारतीय स्वातंत्र्य लढयात प्रतिसरकारच्या कार्यात स्त्रियांनी दिलेले योगदान आपल्या लक्षात येते स्वातंत्र्यलढयात फक्त स्वातंत्र्य सैनिकच समाविष्ट होते असे नाही तर खेडयांपाडयातील सर्वसामान्य जनता स्त्री, पुरुष इत्यादींनी निस्वार्थपणे स्वातंत्र्याचा अग्नीकुंडात उडी घेतली. घरादारांवर तुळशीपत्र ठेवून स्वातत्र्य देवतेची आराधना करण्यात मग्न होते. जाती पाती, धर्म, पंथांचा भेद बाजूला ठेऊन फक्त भारताला स्वंतत्र करणे हा एकच ध्यास त्यांना होता.

९ ऑगस्ट १९४२ ची चळवळ देशभर वेगाने पसरली. परंतु पुढची दिशा व कार्य स्पष्ट नसल्यामुळे ही चळवळ तितक्याच वेगाने शांत झाली. परंतु आता देशाला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय ही चळवळ थांबवायाची नाही असे प्रतिसरकारच्या भूमिगत कार्यकर्त्यांनी ठरविले. त्यातून ग्रामराज्याच्या माध्यमातून स्वशासन निर्माण करण्याच्या हेतूने सातारकरांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार स्थापन केले. या प्रतिसरकारात आपले योगदान दिलेल्या स्त्रियांची भूमिका व कार्य जे आजपर्यंत इतिहासात अज्ञात आहे. ते ज्ञात करुन देण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासामुळे आजच्या पिढीला, २१ व्या शतकातील आधुनिक स्त्रियांना तत्कालीन स्त्रियांनी प्रतिसरकारच्या माध्यमातून केलेले कार्य ज्ञात होईल आणि त्यांच्याबद्दल प्रेम, आदर निर्माण होऊन आपल्या कार्य कर्तुत्वाची दाही दिशा उजळण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळेल या दृष्टिने प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे :-**

१) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री से-नानींच्या कार्याचा अभ्यास करणे..
२) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री सेनानींच्या राजकीय प्रशिक्षण केंद्राचा अभ्यास करणे.
३) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री सेनानींच्या राजकीय कार्याचा अभ्यास करणे.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

४) सातारच्या प्रतिसरज ारमधील स्त्री सेनानींच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

५) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री सेनानींच्या सशस्त्र क्रांती चळवळीतील सहभागाचा विश्लेषणात्मकअभ्यास ज रजे.

**संशोधनाची परिकल्पना :-**

१) सातारचे प्रतिसरकारमध्ये स्त्री सेनानींचे योगदान अफाट आहे.

२) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री सेनानींनी राजकीय प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

३) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री से-ना-नीं-नी दैदिप्यमान राजकीय सहभाग -नोंदविला.

४) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री से-ना-नीं-नी सामाजिक कार्य अफाट आहे.

५) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री से-नां-नीचा सशस्त्र क्रांती चळवळीचा इतिहास विशाल आहे.

**प्रतिसरकारमधील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाजी स्त्री से-ना-नी :-**

सातारच्या प्रतिसरकार चळवळीत स्त्रियांचा सहभाग हा मोठया प्रमाणात होता. यामध्ये प्रत्यक्ष चळवळीत सहभाग असलेल्या स्त्रिया व क्रांतीकार्यात अप्रत्यक्षपणे क्रांतीकारकांना मदत करणाऱ्या स्त्रिया अशा दोन दृष्टिकोनातून पहावे लागते. यात अनेक जाती, धर्म, पंथाच्या स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. गीताबाई बाबर, सत्यभामाबाई जोशी, तारामती कापरे, इंदूमती पाटील, लक्ष्मीबाई पाटील, शंकुतलाबाई रणखांबे, मुक्ताबाई साठे, सुभद्राबाई सावंत इत्यादी स्त्रीया प्रत्यक्षपणे लढयात सहभागी होत्या तर विजया बर्डे, इंदिराबाई देशपांडे, सोनाबाई जगताप, पद्मावती कुलकर्णी, शंकुतला कुलकर्णी, सरस्वती कुलकर्णी, विजया लाड, गंगूताई लाड, शालूताई मिरगे, लक्ष्मी नायकवडी, सगुबाई निवडे, इंदूमती पाटणकर, गंगूताई पाटील, राधाबाई पोळ, कमल शेंडगे इत्यादी अनेक स्त्रियांचा उल्लेख येतो.

याचप्रमाणे सौ. लीलाताई पाटील, राजमती पाटील, लक्ष्मीबाई नायकवडी, विजया लाड, इत्यादी स्त्रीया प्रतिसरकारात महत्त्वाची भूमिका निभावतांना दिसून येतात. प्रत्यक्ष लढयात सहभागी होणाऱ्या स्त्रियां अनेक मोहिमावर स्वतः जातीने हजर राहत असत तर अप्रत्यक्षपणे कार्य करणाऱ्या स्त्रिया भूमिगतांना (स्त्री-पुरषां-ना) विविध प्रकारची मदत करीत असत.

**प्रतिसरकारमधील स्त्री सेनानींचे राजकीय प्रशिक्षण केंद्र :-**

तत्कालीन सामाज परीस्थितीचा अभ्यास केल्यास आपणास लक्षात येते की, स्त्रियांचे विश्व ‘ चूल आणि मूल’ इतकेच मर्यादित होते. विविध सामाजिक बंधनामधून या स्त्रियांचे बाहेर येऊन प्रतिसरकारात काम करणे ही ज ौतूकास्पद बाब होती.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

या काळात येरवडा जेल हे खरे राजकीय प्रशिक्षण केंद्र होते असे म्हटल्यास हरकत नाही. अरुणा असफअली, प्रेमाकंटज् , पूर्णिमा बॅनजी, उषा मेहता, मणिबेन पटेल हया सगळया वरच्या स्तरावर ज ाम ज रजाऱ्या स्त्रियांना राजकीय पार्श्वभूमी होतीच. परंतु लीलाताई पाटील, राजमती पाटील, लक्ष्मीबाई नायकवडी या स्त्रियां-ा कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती तरी सुध्दा या बायकांनी इंग्रज सरकारला हादरवून सोडले.

ऑगस्ट १९४२ च्या चळवळीत लीलाताईंनी अंमळनेरमध्ये मार्शल लॉ तोडला. तर राजमती पाटील यांनी कोल्हापूर मध्ये मार्शल लॉ तोडल्यामुळे त्यांना शिक्षा होऊन त्या येरवडा जेलमध्ये पोहचल्या. तेव्हा उपरोक्त भगिनी सर्व येरवडा जेलमध्ये राजकैदी विभागात होत्या. अर्थातच हया नवशिख्या लीलाताई आणि राजमती पाटील यां-ा या सर्व राजकैदी भगिनींचे सहचार्य लाभले.

क्रांतीकारकांना भेटावयास येणारे लोक सातारा, कोल्हापूर जवळील संपूर्ण इंथबूत माहिती देत. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील घडामोडी समजत असत. या महिला इतर कैदयांची बौध्दिके घेत असत. त्यामुळे राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकैदयांच्या सान्निध्यात आपोआपच प्रशिक्षित होऊ लागल्या होत्या. राजकीय चळवळीसाठी डोळस वृत्ती प्राप्त झाली. जणूकाही येरवडा जेल म्हणजे राजकीय कार्याचे प्रशिक्षण केंद्र होते असे म्हणण्यास हरकत नाही.

**प्रतिसरकारमधील स्त्री सेनांनीचे राजकीय कार्य :-**

प्रतिसरकारमधील स्त्रियांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती. त्या सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रिया होत्या. लीलाताईंनी तर पतिसोबत सासरी गावात फिरल्यामुळे त्यांच्या सासरच्या कुटुंबियांनी त्यांना वाळीत टाकले होते. तरी सुध्दा नवऱ्याच्या सहकार्यासाठी नर्सिंगचे प्रशिक्षण घेऊन अंमळनेरमध्ये सुभाष चौकात हे दाम्पत्य आपला दवाजा-ा थाटतात. आणि १९४२ च्या राष्ट्रीय लढयात स्वतः उत्तमराव भूमिगत होऊन सातारच्या प्रतिसरकारात पोहचतात. तर लीलाताई सहकाऱ्यांच्या मदतीने अंमळनेरमध्ये मार्शल लॉ तोडतात. याशिवाय सरकारी ज ार्यालये जाळतात. यामुळे साडे सात वर्षाची शिक्षा होऊन त्या धुळे, ठाणे करीत येरवडा जेलमध्ये पोहचतात. व तेथून सातारकरांच्या मदतीने जेलमधून फरार होतात व सरळ प्रतिसरकारात दाखल होऊन तूफान सेनेच्या सेनापती म्हणून विराजमान होतात.

राजमती पाटील यांनीही कोल्हापूर चौकात मार्शल लॉ तोडून येरवडा जेलमध्ये हजर झाल्या होत्या. सहा महिन्यातच त्यांची सुटका झाली. त्या पुन्हा प्रतिसरकारच्या कार्यात सहभागी झाल्या आणि नागनाथ आण्णाबरोबर धुळे खजिना लूटीसाठी साताऱ्याहून खान्देशात पोहचल्या होत्या. परंतु मार्गातील अडचणी लक्षात घेता त्यांना प्रत्यक्ष लूटीत सहभाग घेऊ दिला -ाही.

लीलाताई पाटील आणि राजमती पाटील हया सातारच्या प्रतिसरकारातील तूफानी सेनानीच्या कॅप्टन होत्या. स्त्री तूफानी सेनेला प्रशिक्षण देणे, त्यांची बौध्दिके घेणे, प्रत्यक्ष मोहिमेवर त्या सोबत असत.

सशस्त्र क्रांतीदलात स्वतः लीलाताई पाटील, राजमती पाटील, लक्ष्मीबाई नायकवडी, विजया लाड कार्यरत होत्या. मोहिमा आखणे आणि फत्ते करण्याची जबाबदारी त्या यशस्वीपणे पूर्ण करत. पुरुषांप्रमाजे जांदयावर बंदूज घेऊन मोहिमा फत्ते करण्यात त्या नेहमी अग्रेसर असत.

**प्रतिसरकारमधील स्त्री सेनानींचे सामाजिक कार्य :-**

राजकीय कामाबरोबरच सामाजिक कार्यातही त्या नेहमीच अग्रेसर असत. समाजात त्या काळात अनेक वाईट रुढी परंपरा होत्या त्यापूर्ण करतांना सर्वसामान्यांना ऋण काढून सण साजरा करावा लागत असे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचे कायमचे दिवाळे निघत असे.

सत्यशोधक समाजाची विचारधारा जोपासणाऱ्या या स्त्रियांनी समाजात गांधीलग्न पध्दत रुढ केली त्यामुळे लग्न प्रसंगी बडेजाव दाखविण्यासाठी ऋण काढण्याची पध्दत बंद झाली. त्यामुळे सावकारशाहीलाही पाबंद बसला. सर्वसामा-यांनी बडेजाव दाखविण्यासाठी कर्ज काढणे किंवा शेती विकणे, गहाण ठेवणे हा प्रकार बंद झाला.

जुन्या चालीरितींमुळे अनेक लग्न झालेल्या मुलींचे सासरी जमले नाही की, त्या माहेरी परत येत. त्यामुळे त्यांचे नवरे व्यसनी बनत तर कधी कधी स्त्रीयासुध्दा वाहवत जात. त्यामुळे दोन्ही कुटुंबाचा नाश होत असे. अशा प्रसंगी स्वतः पुढाकार घेऊन नवरा बायकोची समजूत काढून त्यांचे संसार सुखाचे केले. अनेक कुटुंबाचे पु-नर्वस-न यांनी केल्यामुळे प्रतिसरकारला दुवा मिळत होता.

भूमिगत सातारकरांची कुटुंबे वाऱ्यावर सोडली जाणार नाहीत याचीही खबदारी या सेनांनीनी घेतली होती. कर्ता पुरुष घराबाहेर असल्यामुळे त्या कुटुंबाचा उदरनिर्वाह, अडीअडचणी जातीने सोडविण्याचे कार्य प्रतिसरकारच्या स्त्री सेनानी अगदी बिनदिक्कतपणे करीत होत्या.

**प्रतिसरकारमधील स्त्री सेनानींची सशस्त्र क्रांती चळवळ :-**

प्रतिसरकारमधील स्त्री सेनानी राजमती पाटील, सौ. लीलाताई पाटील, लक्ष्मीबाई नायकवडी या कुंडल ग्रुपसोबत काम करीत होत्या. महात्मा गांधीजीचे नेतृत्व मान्य करणारे हे सेनानी आझाद हिंद सेनेप्रमाणे काही तरी वेजळे करुन दाखविण्याची जिद्द त्यांच्यात होती. त्यांच्यातील उत्साह आणि संघटन डोळे दिपवून टाकणारे आजि म-न भारावून सोडणारा होता.

काही तरी स्वतंत्रपणे करुन दाखवण्याकडे त्यांचा कल होता. राजमती पाटील यांचे ऐतवडे येथील घर क्रांतीकारकांचे केंद्र बनले होते. ऐतवडे येथेच कार्यक्रमांचे आयोजन आणि नियोजन होत होते. २४ जुलै १९४५ ला फितूरीमुळे नागनाथ नायकवडी येथेच पोलिसांच्या हाती लागले होते. परंतु लवकरच म्हणजे १० सप्टेंबर १९४५ ला त्यानी भिंतीजवळ पिरॅमिड करुन त्यांनी पलायन केले.

नागनाथ आण्णा जेलमध्ये असतांना धुळे खजिना लुटीतील पैसा अच्युतराव पटवर्धन यांनी क्रांतीकार्यासाठी मागितला परंतु राजमती पाटील यांनी तो दिला नाही. स्वतः सामाजिक आणि राजकीय विधायक कार्यासाठी त्याचा वापर केला. आणि सशस्त्र क्राती चळवळ ही यशस्वी केली.

**निष्कर्ष :-**

१) सातारच्या प्रतिसरकारमध्ये राजमती पाटील, लीलाताई पाटील, लक्ष्मीबाई नायकवडी, विजया लाड यासारख्या अनेक स्त्री सेनानींची महत्वपूर्ण भूमिका बजावून आपल्या कार्याचा ठसा इतिहासात उमटवला.

२) सातारच्या प्रतिसरकारमध्ये समाविष्ट होणाऱ्या स्त्रिया सर्वसामान्य कुटुंबातील असून त्यांना कोणतीही राजकीय पाश्र्वभुमी नव्हती. तरी सुध्दा त्यांनी राजकीय धडे आत्मसात केले. येरवडा जेलमध्ये राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील महिला राजकैदीशी त्यांचा संबंध आला. साहचर्य लाभले. तेथेच त्यांनी राजकीय प्रशिक्षण घेतले. येरवडा जेल हेच राजकीय प्रशिक्षणाचे केंद्र बनले होते.

३) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री सेनांनीनी मार्शल लॉ तोडणे, धुळे खजिना लूटीत सहभाग दिला. आणि ग्रामराज्यात न्यायदान करतांना स्वतः बंदुका खांदयावर घेऊन उपस्थिती नोंदविली. प्रत्यक्ष मोहिमात सहभाग घेतला.

४) या स्त्री सेनानींनी सामाजिक रुढी परंपराना फाटा देऊन गांधीलग्न पध्दती सुरु केली, मुंलींचे संसार बसविले अनेक कुटुंबाचे पुनर्वसन केले भूमिगत कार्यकर्त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी घेतली.

५) सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्री सेनानी पुरुषांपेक्षा तसूभरही मागे नव्हत्या प्रत्यक्ष मोहिमा त्यांनी फत्ते केल्या. सशस्त्र चळवळ उभारुन प्रतिसरकारचा कारभार देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्वतंत्र आणि सुरळीतपणे सुरु ठेवला होता.

**संदर्भ सूची :**

*बा.ग. पवार, क्रांतिसिंह नाना पाटील (प्रसिरकारचा रोमाचकारी इतिहास) मातृभूमी प्रकाशन पुणे २००१*
*विलास पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, अरिहंत पब्लिकेशन्स पुणे (चौथी आवृत्ती)*
*जयसिंगराव पवार, क्रांतिसिंह पाटील, रिया पब्लिजे श[illegible] ज ोल्हापूर १९८३*
*ज.य. अहिर, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, हुतात्मा प्रकाशन वाळवा, २०१२*
*दैनिक पुढारी अंक*
*राघव शिवणीकर, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवैभव प्रिटींग प्रेस, विटा १९८६*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*